संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
23 JUL 2026
प्राप्त झाले सही.......

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उप संचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विनंती बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश क्रमांक:-ई-१७३९०००/कोषा. प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२३.०७.२०२६.

**शासन आदेश**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतूदीनुसार आणि बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाराच्या मान्यतेने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील खाली नमूद करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या पदावर विनंती बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नाव | सध्याचे पदनाम व कार्यालय | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | श्रीम. नितल लव्हाळे | अवर सचिव तथा उपसंचालक, मदत व पुनर्वसन कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे |
| २. | श्री. सचिन संदिपान इगे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर |
| ३. | श्रीम. शबाना सुलतानशहा फकिर (श्रीम. शबाना लईक अहमद शाह) | मुख्य लेखा परीक्षक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि. नाशिक | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव |
| ४. | श्रीम. पुनम नारायण पाटील | उपसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पनवेल महानगरपालिका, पनवेल. |

२. वरीलप्रमाणे बदली झालेले अधिकाऱ्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली अधिकाऱ्याची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करुन संबंधित अधिकाऱ्यास तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

0150412026/1992
23.7.2026

४. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(वि. अ. धोत्रे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर, *
३. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
४. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई,*
५. प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,*
६. संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख, *
७. संबंधित अधिकाऱ्यांचे नवीन पदस्थापनेच्या पदाचे कार्यालय प्रमुख,*
८. संबंधित अधिकारी,*
९. निवडनस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)